# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.

E-mail : diplomadesk10dte@gmail.com Internet : www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक : 10/एनजीपी/मुदतठेव/2015/प्रवेशक्षमतावाढ/ 46

दिनांक : 29 JAN 2015

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे.

**विषय : पदविका अभ्यासक्रमांकरीता संयुक्त खात्यात मुदतठेव ठेवण्याबाबत व संचालनालयाची मान्यता प्रस्ताव तात्काळ सादर करण्याबाबत..**

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थामार्फत शैक्षणिक वर्ष 2014-15 मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता याद्या तपासणी करतांना काही संस्थांमधील काही अभ्यासक्रमांना संचालनालयाची अंतिम मान्यता घेण्यात आलेली नाही किंवा काही अभ्यासक्रमाकरीता संयुक्त खात्यात मुदतठेवी ठेवण्यात आलेल्या नाही किंवा ठेवलेल्या मुदतठेवी मुदत संपल्यानंतर बंद करण्यात आलेल्या आहेत. तसेच सदर अभ्याक्रमांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेमार्फत वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आलेली आहे तसेच सदर अभ्यासक्रमांत शैक्षणिक वर्ष 2014-15 पर्यंत विद्यार्थी प्रवेशित झालेले आहेत तथापि उपरोक्त त्रुटींमुळे सदर संस्थांच्या/ अभ्यासक्रमांच्या गुणवत्ता याद्यांना मान्यता देण्यात आलेली नाही अशा संस्थांबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

1. सदर संस्थांपैकी ज्या संस्थांनी पदविका अभ्यासक्रमाकरीता संयुक्त खात्यात मुदतठेवी ठेवण्यात आलेल्या नाही किंवा ठेवलेल्या मुदतठेवी मुदत संपल्यानंतर बंद करण्यात आलेल्या आहेत अशा संस्थांना तत्कालीन शासन निर्देशानुसार प्रती अभ्यासक्रम विहीत रकमेची, विहीत मुदतीसाठी पुनःश्च नवीन मुदतठेव संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संस्था यांच्या संयुक्त खात्यात ठेवण्याबाबत संस्थेला कळविण्यात यावे. सदर नवीन मुदतठेवीची मुळप्रत या संचालनालयास तसेच विभागीय कार्यालयास पडताळणी करीता सादर केल्यानंतर सदर अभ्यासक्रमांच्या गुणवत्ता याद्या तपासण्यास हरकत नसावी. तसेच संबंधीत संस्थांना असेही कळविण्यात यावे की, संयुक्त खात्यातील मुदतठेवीची मुदत संपल्यानंतर मुदठेवीचे नुतनीकरण करण्यास व जमा व्याज संस्थेच्या खाती जमा करण्यास या संचालनालयाची पुर्व परवानगी घेण्यात यावी.
2. तसेच ज्या संस्थांनी पदविका अभ्यासक्रमांबाबत शासन निर्णयात नमूद अटी व शर्तींची पुर्तता करुन प्रवेश करण्यासाठी संचालनालयाची मान्यता घेतलेली नाही, अशा संस्थांनी सदर अभ्यासक्रमासाठी संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संस्थाचालक यांच्या संयुक्त खात्यात नॅशनलाईज किंवा शेडयुल बँकेत, तत्कालीन शासन निर्देशाप्रमाणे विहीत करण्यात आलेली मुदतठेव 10 वर्ष मुदतीसाठी जमा करण्यास व सोबत जोडलेल्या नमुन्यात रुपये 100/- च्या स्टॅम्पपेपरवर नोंदणीकृत हमीपत्र या संचालनालयास सादर करण्यास सांगण्यात यावे. तसेच सदर अभ्यासक्रमासाठी नियुक्त केलेल्या शिक्षकवर्गाची यादी, त्यांचे नियुक्ती आदेश व रुजू अहवाल, खरेदी करण्यात आलेल्या यंत्रसामुग्रीची यादी, ग्रंथालयातील पुस्तके यांच्या पावत्या व पुरवठादाराला रक्कम अदा केल्याच्या मुद्रांकित पावत्या इ. सोबत जोडलेल्या यादीनुसार प्रस्ताव तात्काळ या संचालनालयास सादर करण्याबाबत कळविण्यात यावे. सदर अभ्यासक्रमांना संस्थांनी उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे या संचालनालयास प्रस्ताव सादर करुन संबंधीत अभ्यासक्रमांत प्रवेश करण्यास संचालनालयाची मान्यता घेतल्यानंतरच सदर अभ्यासक्रमांच्या गुणवत्ता याद्या तपासण्यात याव्यात.
3. तसेच उपरोक्त बाबींकरीता संबंधीत संस्थांना यापुढे भविष्यात असे घडणार नाही याबाबत दक्षता घेण्यात यावी अन्यथा संस्थेविरुध्द नियमानुसार कारवाई करण्यात येईल ही बाब आपल्या स्तरावरुन निदर्शनास आणून देण्यात यावी.

( डॉ. सुभाष महाजन )
संचालक, तंत्रशिक्षण, म.रा. मुंबई

---

सहसंचालक तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय, नागपूर.
क्र :—तंशिसं/विकाना/पदविका/२०१५/415
दि. 6 FEB 2015

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विनाअनुदानित
अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था,
नागपूर विभाग .

त्यांना कळविण्यात येते की, संचालनालयाचे सदर पत्रातील सूचनांची नोंद घेऊन त्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( गुलाबराव ठाकरे )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय,
नागपूर

प्रतः— प्रोग्रामर , यांनी सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

पुर्वी ज्या संस्थांनी औषधनिर्माणशास्त्र / अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या नवीन अभ्यासक्रम/ प्रवेशक्षमतावाढ करीता संचालनालयाची अंतिम परवानगीसाठी घेतलेली नसेल अशा संस्थांनी खालीलप्रमाणे कागदपत्र प्रस्तावासोबत सादर करावीत.

1. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून (AICTE) संस्थेस प्राप्त झालेल्या **मान्यतेची साक्षांकित छायाप्रत प्रत** तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून (AICTE) **वेळोवेळी (शैक्षणिक वर्ष 2014-15 पर्यंत)प्राप्त झालेले मुदतवाढपत्रची(EOA) प्रत.**
2. शासनामार्फत मिळालेल्या **शासन मान्यता**(GR) पत्रांची साक्षांकित छायाप्रत प्रत.
3. तत्कालीन शासन निर्देशांप्रमाणे विहीत रकमेची **10 वर्ष** मुदतीसाठी करण्यात आलेली संचालक तंत्रशिक्षण, म.रा., मुंबई यांच्या संयुक्त मुदतठेव मुळपावती व त्याची साक्षांकित छायाप्रत प्रत.
4. सोबत जोडण्यात आलेल्या नमुन्यात रुपये 100/- च्या स्टॅम्प पेपरवर नोंदणीकृत (नोटरी) **मुळ हमीपत्र** सादर करावे.
5. सदर प्रवेशक्षमता वाढीच्या अनुषंगाने संस्थेत नियुक्ती स्वीकारण्यात आल्याबाबतचे शिक्षकीय कर्मचाऱ्यांचे रु.100/- च्या स्टँप पेपरवर **(शिक्षक निहाय वेगवेगळे) त्यांच्या पासपोर्ट फोटोसहित** करण्यात आलेले मुळ शपथपत्र.
6. सदर प्रवेशक्षमता वाढीच्या अनुषंगाने संस्थेत नियुक्त करण्यात आलेल्या प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे नेमणुक पत्र, रुजु अहवाल यांच्या साक्षांकित छायाप्रत प्रती.
7. संस्थेत खरेदी करण्यात आलेले पुस्तके/ साहित्याची यादी, खरेदी केल्याचे बिल, तसेच संबंधीतास पैसे अदा केल्या बाबतच्या पावत्यांची साक्षांकित छायाप्रत प्रत.
8. सदर प्रवेशक्षमता वाढीच्या अनुषंगाने इमारतीचे बांधकाम क्षेत्राबाबत **नोंदणीकृत आर्किटेक्टचे** प्रमाणपत्र व इमारतीत वीज, पाणी, टॉयलेट, बाथरुम, लेडीजरुम इ. सुविधा असल्याबाबत प्रमाणपत्र.
9. इमारतीत **आग प्रतिबंधक यंत्रणा** बसविण्यात आल्याबाबतची कागदपत्र.
10. मान्यतेसाठीचा प्रस्ताव **बॉक्स फाईलमध्ये** सादर करावा व सर्व कागदपत्र प्राचार्यांनी **साक्षांकित** करुन सादर करावीत. तसेच संस्थांनी उपरोक्त नमूद कागदपत्र तात्काळ सादर करुन संचालनालयाची अंतिम मान्यता घ्यावी अन्यथा प्रवेशाबाबत/ गुणवत्ता याद्यांबाबत काही समस्या उदभवल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संस्थेची राहील याची नोंद घ्यावी.